पत्र क्रमांक- २८ दिनांक- १९/०८/२०२२

प्रति,
मा. कार्यकारी अभियंता,
महावितरण, श्रीरामपूर विभाग

(योग्य मार्गे रवाना)

विषय- सन २०२१-२२ मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा अहवाल.

| अ. क्र. | केलेले काम | स्पष्टीकरण | पुरावे | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | ४०- २०० अँपीअर मीटरची जीनस कंपनी कडून रिकव्हरी | महावितरण मार्फत ४०-२०० अँपीअर क्षमतेचे मीटर प्रोग्रामिंग करून ग्राहकाला बसविण्यासाठी जीनस कंपनीला ठेका देण्यात आला होता. त्याद्वारे श्रीरामपूर विभागीय कार्यालय आणि राहुरी उपविभागीय कार्यालयामार्फत जीनस कंपनीला मीटर देण्यात आले. जीनस कंपनीने ते काम वेळेत पूर्ण केले नाही. तसेच महावितरण कंपनी मार्फत त्या बाबत विचारणा केली असता जीनस कंपनीने असमाधानकारक उत्तरे दिली तसेच उर्वरित, वापर न केलेले मीटर महावितरण कंपनीला परत करावे असे आदेश दिले असता जीनस कंपनीने त्यांच्याकडे मीटर नाही असे सांगितले. तसेच त्यांचे कडे ते मीटर आहेत याचा काही पुरावा देखील महावितरण कंपनीकडे नव्हता.<br><br>अशा वेळी तत्कालीन कार्यकारी अभियंता. श्रीरामपूर विभाग यांनी हे प्रकरण माझ्याकडे सोपविले. मी प्रकरणाची चौकशी सुरु केली, संबंधित पुरावे गोळा केले | १. पत्र क्रमांक-काअ/ श्रीरामपूर/ तांत्रिक/ १७८७, दि. ०५/१०/२०२१.<br>२. जीनस कंपनीचे पत्र क्रमांक- GPIL/GM-10/MSEDCL/12, dated 10/01/2021.<br>३. रिकव्हरी केलेल्या मीटर सोबत माझा आणि सहाय्यक अभियंता, गाळणी कक्ष यांचा फोटो. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आणि ४०-२०० अँपीअर क्षमतेचे १० मीटर हे जीनस कंपनीकडे आहे सिद्ध केले. त्याच पुराव्याच्या आधारे जीनस कंपनीने देखील उर्वरित मीटर्स त्यांचेकडे असल्याचे मान्य केले आणि ते १० मीटर्स परत देखील केले. त्यांचे डिटेल्स खालील प्रमाणे:<br><br>१. ज्या सीरिअल नंबरचे मीटर्स दिले त्यापकी ४ मीटर्स जीनस कंपनीने महावितरणला परत केले.<br>२. उर्वरित ६ मीटर्स जीनस कंपनीने गहाळ केले. गहाळ केलेल्या मीटर्सच्या बदल्यात जीनस कंपनीने नवीन दुसऱ्या सीरिअल नंबरचे ६ मीटर्स महावितरणला परत केले. त्यासंदर्भात महावितरण आणि जीनस मार्फत स्वतंत्र पोलीस तक्रारी करण्यात आल्या आहेत.<br>**टीप- सदर मीटरची किंमत अंदाजे रु. २,४७,५००/- एवढी आहे.** | | |
| २ | गॅरंटी पिरेड मध्ये नादुरुस्त झालेले ४०-२०० अँपीअर मीटरची रिप्लेसमेंट | गॅरंटी पिरेड मध्ये नादुरुस्त झालेले ४०-२०० अँपीअर क्षमतेचे मीटर बदलवून किंवा दुरुस्त करून मिळावे यासाठी मी गाळणी कक्षात कार्यरत असताना जीनस कंपनीला त्यासंदर्भात पत्र दिले होते. परंतु त्यांनी ते मीटर दुरुस्त करून दिले नव्हते.<br><br>वरील प्रमाणे १० मीटर्सची रिकव्हरी झाल्यावर मी ह्या गॅरंटी पिरेड मध्ये नादुरुस्त झालेले ४०-२०० अँपीअर क्षमतेचे मीटर बदलवून देण्यासाठी जीनस कंपनीकडे पाठपुरावा केला आणि त्यांचेकडून ते मीटर्स एखील बदलवून घेतले. एकूण मीटर्स पैकी एवढे मीटर्स बदलवून दिले.<br><br>**टीप- सदर मीटरची किंमत अंदाजे रु. १,४८,५००/- एवढी आहे.** | 1. पत्र क्रमांक- EE/ SRM/ 2019-20/T/Filter/1557, dated 31/05/2021.<br>2. जीनस कंपनीचा ईमेल दि. ३०/१२/२०२१.<br>3. इंव्हाइस नंबर- G302/21, dated 30/12/2021. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ग्राहकांचे नादुरुस्त मीटर बदलवून देण्यासाठी प्रयत्न | सूतगिरणी कक्षात थकबाकीत वीजबिलाची वसुली करताना असे ग्राहक निदर्शनास आले कि, ज्यांचे मीटर अनेक दिवसांपासून नादुरुस्त झाल्याने त्यांना सरासरी पद्धतीने वीजबिल येत होते. अशा ग्राहकांनी त्यांचे मीटर बदलवून दिल्यास थकीत वीजबिल तत्काळ भरण्यासाठी तयारी दाखवली. हि बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिली आणि वरिष्ठांनी तत्काळ त्यांचे मीटर तत्काळ बदलवून देण्याच्या सूचना संबंधिताना दिल्या. हे काम मी स्वतः आणि श्री. अक्षय विखे, सहाय्यक अभियंता, श्रीरामपूर विभाग यांनी मिळून केले आहे. | पत्र क्रमांक-काअ/ श्रीरामपूर/ तांत्रिक/ १८, दि. ०५/०१/२०२२ | |
| ४ | ठळकपणे महाराष्ट्र शासन लिहिलेल्या आय कार्ड लेसचे वितरण | श्रीरामपूर उपविभागातील सूतगिरणी कक्ष कार्यालयात वीजबिलाच्या थकबाकी वसुली साठी जात असताना अनेकदा ग्राहक आक्रमक होत असे. काही वेळेस शाब्दिक वाद तर काही वेळेस ग्राहक आक्रमक होत असे. अनेकदा काही जागरूक ग्राहक महावितरणा कर्मचाऱ्याकडे ओळखपत्राची मागणी करीत असे.<br><br>बिल थकबाकी वसुलीच्या वेळेस असे कटू प्रसंग येऊ नये आणि ग्राहकाला देखील अधिकारी तथा कर्मचारी यांची ओळख व्हावी म्हणून सर्व कर्मचारी यांचे करिता महाराष्ट्र शासन असा उल्लेख असलेली आय कार्ड लेस आणि होल्डर सर्व कर्मचारी यांच्यासाठी आणले. | निवडक फोटो | |
| ५ | एकलहरे येथे प्रशिक्षक म्हणून कामगिरी | मी साधारण ३ वर्षे गाळणी कक्ष, श्रीरामपूर विभाग येथे 'गाळणी कक्ष प्रमुख' या पदावर काम केले आहे. तेथे काम करीत असताना वारंवार नादुरुस्त होणाऱ्या वितरण रोहित्रांची आणि नादुरूस्तीच्या कारणांची विशेष तपासणी करून 'वितरण रोहित्र नादुरुस्त होण्याची कारणे व उपाय' यासंदर्भात अभ्यास करून हि नादुरुस्ती कशी टाळता येईल यासंदर्भात जनजागृती करीत आहे. | मा. मुख्य महाव्यवस्थापक, प्रशिक्षण आणि सुरक्षा केंद्र, एकलहरे यांचे ईमेल,<br><br>१. दि. ०९/०५/२०२२<br>२. दि. ०१/०७/२०२२ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | या विषयासंदर्भातील सर्व कामकाजाची दाखल घेऊन मा. मुख्य महाव्यवस्थापक, प्रशिक्षण आणि सुरक्षा केंद्र, एकलहरे यांनी देखील मला प्रशिक्षण आणि सुरक्षा केंद्र, एकलहरे, नाशिक येथे अभियंता वर्गाच्या प्रशिक्षण कार्यक्रमात माझी या विषयासंदर्भातील माहिती शेअरची संधी दिली. त्यामुळे मी साधारण ५ ऑफलाईन वर्गाना माझी माहिती शेअर केली आहे. ह्यात मा. गिडगे साहेब यांनी प्रशिक्षणाचे अधिक खोल बारकावे देखील मला शिकवले. | | |
| ६ | ऑनलाईन प्रशिक्षक म्हणून कामगिरी | 'वितरण रोहित्र नादुरुस्त होण्याची कारणे व उपाय' या विषयासंदर्भातील केलेल्या सर्व कामकाजाची दाखल घेऊन मा. मुख्य महाव्यवस्थापक, प्रशिक्षण आणि सुरक्षा केंद्र, एकलहरे यांनी देखील मला ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण वर्गात माझी या विषयासंदर्भातील माहिती शेअरची संधी दिली. | मा. मुख्य महाव्यवस्थापक, प्रशिक्षण आणि सुरक्षा केंद्र, एकलहरे यांचे पत्र क्रमांक- CGM/T&S/EKL/NSK/SLT/OT_Aug/2021-22/7321, dated 30/07/2021 | |
| ७ | मीटर टेस्टिंग बेंच | श्रीरामपूर विभागात बिलिंग मध्ये फॉल्टी स्टेटस असलेल्या ग्राहकांची संख्या प्रचंड वाढत होती. मीटर तपासणी साठी मीटर बेंच नसल्याने तपासणी शक्य नव्हती. तसेच अशा ग्राहकांकडील थकबाकी देखील वाढत असल्याने मीटर टेस्टिंग सुरु करणे आवश्यक होते. अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. सुरेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ काम सुरु केले तेव्हा असे निदर्शनास आले कि, श्रीरामपूर विभागातील देवळाली उपविभागात एक जुना सिंगल फेज Accucheck आहे तसेच तो चालू करणे देखील शक्य आहे. मी तात्काळ श्री. सुरेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे येथील मीटर टेस्टिंग लॅब मध्ये चौकशी करून जुना सिंगल फेज Accucheck कॅलीब्रेशन करून आणला व श्रीरामपूर विभागात सिंगल फेज मीटर टेस्टिंग सुरु केली. | पत्र क्रमांक- EE/SRM/Tech/187, dated 21/01/2022 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | मीटर टेस्टिंग लॅब | श्रीरामपूर विभागात ग्राहकांना बसविलेले अनेक सिंगल फेज आणि थ्री फेज मीटर फॉल्टी आहेत किंवा नाही हे तपासण्यासाठी टेस्टिंग बेंच उपलब्ध नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. म्हणून श्रीरामपूर विभागात मीटर टेस्टिंग लॅब सुरु करण्यासाठी प्रयत्न केले आहे. | १. पत्र क्रमांक- EE/SRM/Tech/113, dated 11/01/2022.<br>२. Office Note with statistic of faulty meters, dated 11/01/2022 | |
| ९ | फाईल लिस्टिंग | श्रीरामपूर विभागीय कार्यालयातील जबाबदारी मिळाल्यावर / स्वीकारल्यावर तेथे सर्व कागदपत्रे एकत्रित रित्या होती. सर्वप्रथम तेथील सर्व कागदपत्रांचे वर्गीकरण करून त्यांचे व्यवस्थित फायलिंग आणि नंबरिंग करून सर्व फाइल्सची यादी तयार करून त्यानुसार कामकाज सुरु केले. | तयार केलेल्या फाइल्सची यादी | |
| १० | साखर कारखान्यामधील को-जनरेशन प्लँटचे रीडिंग घेताना अनावश्यक क्रिया वगळणे | श्रीरामपूर विभागीय कार्यालयाअंतर्गत असलेल्या साखर कारखान्यामधील को-जनरेशन प्लँटचे रीडिंग घ्यायला जाताना तेथील सर्व रीडिंग हे लॅपटॉप मध्ये घेऊन नंतर ते सिस्टीम मध्ये अपलोड करावे लागते. परंतु, पूर्ववत परंपरेनुसार लॅपटॉप मध्ये रीडिंग घेऊन सुद्धा सदर रीडिंग मॅन्युअली घेतले जात होते. मी देखील काही दिवस लॅपटॉप मध्ये तसेच मॅन्युअली घेतले होते. परंतु लॅपटॉप मध्ये घेतलेले रीडिंग व्यवस्थित असल्यास मॅन्युअली रीडिंग घ्यायची गरज नसते हे वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिले व त्यानंतर लॅपटॉप मध्ये घेतलेले रीडिंग व्यवस्थित असल्यास मॅन्युअली रीडिंग घेणे बंद केले. त्यामुळे मानसिक आणि शाररीक ताण कमी झाला. त्यामुळे एकूण ११ मीटरचा मॅन्युअली रीडिंग घेतानाचा त्रास वाचला. | --- | --- |
| ११ | लाईन स्टाफ साठी सेफ्टी टेस्टरचा पुरवठा करणे बाबत. | दि. ०९/०१/२०२१ रोजी बाभळेश्वर उपविभागातील कर्मचारी कै. सुभाष काशिनाथ निर्मळ यांचा विद्युत अपघात होऊन मृत्यू झाला. भविष्यात असे अपघात होऊ नये म्हणून माझ्या स्तरावर दोन कर्मचाऱ्यांना इंडक्शन लाईन टेस्टर वाटले. तसेच उर्वरित कर्मचाऱ्यांना देखील सुरक्षिततेच्या दृष्टीने इंडक्शन लाईन | टेस्टर च्या पेमेंट पावत्या व संबंधित कागदपत्रे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | टेस्टर उपलब्ध व्हावे यासाठी प्रथमेश इलेक्ट्रिकल या ठेकेदाराकडे श्री. सुरवाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा केला. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत प्रथमेश इलेक्ट्रिकल यांनी सर्व कर्मचाऱ्यांसाठी असेच इंडक्शन लाईन टेस्टर मिळाले. त्यामुळे एका कर्मचाऱ्याचा जीव जरी वाचला तरी माझे प्रयत्न सफल होतील असे मला वाटते. | | |
| १२ | कार्यालयीन सहकारी यांना कोव्हीड प्रतिबंधक लस उपलब्ध करून दिली. | देवळाली उपविभागातील एका ग्राहकाचा इलेक्ट्रिक शॉक लागून मृत्यू झाला होता व त्यास महावितरण जबाबदार असल्याचे निष्कर्ष मा. विद्युत निरीक्षक, अहमदनगर यांनी काढला होता. मयत व्यक्तीच्या कुटुबीयांनी सदर केलेल्या प्रस्तावात काही तांत्रिक त्रुटी होत्या व त्यामुळे त्यांचे प्रकरण अनेक दिवसांपासून प्रलंबित होते. त्यांचे प्रकरण मी सर्व त्रुटी दुरुस्त करून पूर्ण करून दिले व मयत व्यक्तीच्या वारसांना नुकसानभरपाईची सर्व रक्कम मिळाली. मयत व्यक्तीच्या यांचे सख्खे चुलते देवळाली आरोग्य केंद्र, ता. राहुरी , जिल्हा अहमदनगर, येथे कामाला आहेत.<br><br>कोव्हीड काळात जेव्हा प्रतिबंधक लस उपलब्ध होत नव्हती तेव्हा याच चुलत्यांनी देवळाली आरोग्य केंद्र, ता. राहुरी , जिल्हा अहमदनगर येथे मला व माझ्या कार्यालयीन सहकारी तसेच देवळाली उपविभागातील कर्मचारी यांना लस उपलब्ध करून दिली. | --- | --- |
| १३ | ग्राहकाभिमुख सेवा देण्याचा प्रयत्न | विद्युत अपघात नुकसान भरपाई प्रकरणांमध्ये काही तात्रिक अडचणी आल्यास ग्राहकाला त्रास न देता ती अडचण सोडविण्यासाठी डायरेक्ट संबंधित यंत्रणेशी संपर्क करून काम तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करीत केले आहेत/ करतो आहे.. | सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना यांचे पत्र क्रमांक- ४६६८, दि. २२/०२/२०२२ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | ऑनलाईन पद्धतीने ग्राहकांशी संवाद | काही लांब अंतरावर राहणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या अडचणी सोडविताना प्रत्यक्ष कार्यालयामध्ये बोलाविण्यापेक्षा त्यांना ऑनलाईन पद्धतीने संपर्क करून त्यांच्याशी संवाद साधला. | काही निवडक फोटो/ स्क्रीन शॉट | |
| १५ | इनवर्ड- आउटवर्ड टेबल वर लाईट ची सोय करून दिली | श्रीरामपूर विभागीय कार्यालयातील इनवर्ड- आउटवर्ड टेबल असलेल्या कॅबीन मध्ये लाईट गेल्यास इन्व्हर्टरच्या सप्लायची सोय नव्हती. त्यामुळे महावितरणचा सप्लाय गेल्यास तेथे काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना अंधारात बसावे लागत असे. तसेच काम करताना त्यांना मोबाईल च्या प्रकाशात काम करावे लागे. त्यामुळे त्यांना डोळ्यांना त्रास होत असे. हि बाब लक्षात आल्यावर मी तात्काळ त्यांना वायरिंग मध्ये बदल करून महावितरणचा सप्लाय गेल्यास इन्व्हर्टरच्या मार्फत लाईटची सुविधा उपलब्ध होईल याची व्यवस्था करून दिली. | काही निवडक फोटो | |

आपल्या माहिती आणि पुढील कार्यवाही साठी सविनय सादर.

Sujen.

सुजय रामचंद्र उपाध्ये,
सहाय्यक अभियंता, महावितरण,
श्रीरामपूर विभाग, अहमदनगर मंडळ,
नाशिक परिमंडळ. भ.नि.नि.क्र. २६५९८४१

माहितीस्तव प्रत सविनय सादर-

१. मा. मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक परिमंडळ, नाशिक.
२. मा. अधीक्षक अभियंता, महावितरण, अहमदनगर मंडळ, नाशिक परिमंडळ, नाशिक